भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ९९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १०/०२/२०१७

**१) किराणा दुकानाचा ताला तोडुन साहीत्याची चोरी . :–**

दिनांक ०८+०९/०२/२०१७ चे रात्र. दरम्यान. यातील फिर्यादी मधुकर अर्जन रहागंडाले वय ५२ वर्ष, रा. बपेरा यांचा मधुकर किराणा दुकानाचे समोरील दाराचे ताले कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण तोडुन आत प्रवेश करुन सहारा कंपनीचे आंघोळीचे ०६ साबुन किंमती दुकानातील गल्यातील १०/–रु. च्या २०००/–रु. नोटा २०,०००/–रु, व चिल्लर ५००/–रु. असा एकुण २०,५७८/–रु. चोरुन नेल्याने पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ४३७,३८० भादंवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक ०९/०२/२०१७ चे ०८.१५ वा. दरम्यान. यातील फिर्यादी ताराचंद बिसन कनोजे वय ५१ वर्ष, रा. तकीया वार्ड भोजापुर रोड भंडारा यानी आपली हिरो होंडा कंपनीची पॅशन प्रो काळया रंगाची मोटार सायकल एमएच ३६ व्ही २३७३ किंमती ४०,०००/–रु. ची घरा समोर रस्त्याचे बाजुला ठेवली असतांना कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गलुले पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक ०९/०२/२०१७ रोजी ०८.१५ वा. दर. यातील मृतक बापु डोमा बोरकुटे वय ५५ वर्ष, रा. चोवा यांनी आपल्या शेतातील सागवनाच्या झाडाला नॉयलॉन दोरीने गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी नारायण बापुजी बोरकुटे वय २७ रा. चोवा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे १७४ कलम जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. नंदेश्वर पो. स्टे. भंडारा हे करीत आहे.

**४) विषारी औषध प्राशन करुन उपचारा दरम्यान युवकाचा मृत्यु . :–**

दिंनाक ०१/०२/२०१७ चे १९.००वा ते ०३/०२/२०१७ चे ०८.५० वा. दरम्यान यातील मृतक राकेश विनायक कोरे वय २८ वर्ष रा. विरली बु. हा दारु पिण्याच्या सवईचा असल्याने दारुचे नशेत ब्लेरो किटक नाशक विषारी औषध प्राशन करुन प्रकृती बिघडल्याने त्यास उपचारा करीता ग्रा.रु.पवनी येथुन सा.रु. भंडारा नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे उपचारा करीता भरती केले असता उपचारा दरम्यान दि. ०३/०२/२०१७ चे ८.५० वा मरण पावल्याने पो.स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र पो. स्टे. ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी मपोना. कावळे पो.स्टे. लाखांदुर याचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे १७४ कलम जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहे.

**५) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०९/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर, कारधा, सिहोरा, गोबरवाही, लाखांदुर, करडी, भंडारा येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ५८ लिटर हातभट्टी दारु किंमती ३९३०/–रु. व १ लिटर ३५० मिली देशी दारु किंमती ३७५ रु–/असा एकुण किंमती ४,३०५/–रु.चा माल, तसेच जुगारातुन किंमती १०६३ रु–/ असा एकुण किंमती ५,३६८/–रू.चा माल जप्त करण्यात आला आहे.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०९/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ५७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ४८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.